



दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : ३००, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.११ जून २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## तृणमूलच्या खासदारांतही फूट! NDA ला पाठिंबा देण्याचा २० जणांचा निर्णय

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१०, नवी दिल्ली :** पश्चिम बंगालच्या विधानसभा निवडणुकीतील दारुण पराभवानंतर तृणमूल काँग्रेसमधील बंडाग्नीच्या कोलकात्यात भडकलेल्या ज्वाळा आता संसदीय पक्षापर्यंत पोहोचल्या आहेत. तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी या 'इंडिया' आघाडीच्या बैठकीसाठी दिल्लीत असतानाच पक्षाच्या सुमारे २० खासदारांनी बंड करीत भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीला (एनडीए) पाठिंबा देण्याबाबत लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना पत्र पाठवण्याचा निर्णय घेतला. आमदारांपाठोपाठ खासदारांच्या बंडामुळे ममता यांना फुटीचा दुहेरी धक्का बसला आहे.



ममता यांचे भाचे अभिषेक बॅनर्जी यांच्याकडे संसदीय पक्षाचे नेतृत्व नको, यावर या साऱ्यांचे एकमत होते. तृणमूलचे ज्येष्ठ खासदार सुखेंदू शेखर रॉय यांच्या पुढाकाराने झालेल्या या गुप्त बैठकीनंतर यातील काही खासदारांनी पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री शुभेंदू अधिकारी व भाजप नेते भूपेंद्र यादव यांची दिल्लीत भेट घेऊन संसदीय पक्षाच्या फुटीवर शिक्कामोर्तब केले.

काही दिवसांपूर्वी पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसच्या ८० पैकी ५८ आमदारांनी बंड करून पक्षातून हकालपट्टी झालेले ऋतब्रत बॅनर्जी यांची विधानसभेच्या विरोधी पक्षनेतेपदी निवड केली. आता तृणमूलच्या खासदार काकोली घोष दस्तीदार यांच्या नेतृत्वाखालील २० खासदारांनी बंड करून 'एनडीए'ला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला. 'माझ्यासह जवळपास २० खासदारांनी 'एनडीए'ला पाठिंबा देण्याचा निर्णय लाकसभा अध्यक्षांना कळवला आहे', असे दस्तीदार यांनी सांगितले. मुख्य प्रतोपदावरून दस्तीदार यांना हटवण्याचा निर्णय ममता यांच्या नेतृत्वाखालील तृणमूलने घेतला होता. मात्र, याबाबत लोकसभा सचिवालयाला कळवण्यात आले नव्हते, असे पक्षाच्या एका बंडखोर खासदाराने सांगितले.

दरम्यान, 'इंडिया'च्या बैठकीस ममता यांच्याबरोबर आलेले अभिषेक आणि डेरेक ओब्रायन आदींनी पत्रकारांशी बोलणे टाळले. ज्येष्ठ तृणमूल खासदार सौगत रॉय यांनी आपण त्या बैठकीत नसल्याचा दावा केला. चार वेळा खासदार राहिलेले रॉय (७८) यांनी सांगितले की, या वयात माझ्यासाठी पक्ष बदलणे शक्य नाही. पक्षाच्या काही खासदारांनी काल रात्री दिल्लीत वेगळी बैठक घेतल्याचे माझ्या कानावर आले. मात्र, बैठकीत काय झाले हे तेच सांगू शकतील. त्यांनी माझ्याशी संपर्क साधलेला नाही. पक्षाच्या खासदार डोला सेन म्हणाल्या की, भारतीय जनता पक्षाकडून रॉय व आपल्याशीही संपर्क साधण्यात आला होता, परंतु आम्ही दोघांनीही तो प्रस्ताव नाकारून त्यांना स्पष्टपणे सांगितले की आम्ही तृणमूलसोबतच राहू.

एका तृणमूल नेत्याच्या माहितीनुसार, नाराजांची ही बैठक सुरू असतानाच त्यातील एका खासदाराने कोणालाही न कळवता बैठकीचे फोटो काढल्याने वातावरण तणावपूर्ण झाले. काही खासदारांनी त्यांच्या संमतीशिवाय फोटो काढण्यावर आक्षेप घेतला. त्यामुळे उपस्थितांमध्ये किरकोळ बाचाबाची झाली. रविवारच्या बैठकीत असलेले काही खासदारांनी चर्चाही केल्याचेही समजते.

**दोन तृतीयांश संख्याबळ**

लोकसभेत तृणमूल काँग्रेसचे २८ खासदार आहेत. २० खासदारांच्या बंडामुळे पक्षांतरबंदी कायद्यानुसार दोन तृतीयांश संख्याबळ प्राप्त होत असल्याने बंडखोर खासदार कारवाईपासून वाचणार आहेत. संसदेच्या आगामी पावसाळी अधिवेशनात तृणमूल काँग्रेसमधील प्रचंड फुटीचा मुद्दा सर्वाधिक चर्चेत राहण्याची चिन्हे स्पष्ट आहेत. जुलैच्या तिसऱ्या आठवड्यात पावसाळी अधिवेशन सुरू होण्याची शक्यता आहे.

## बोरी येथील करपरा नदीपात्रातील अवैध वाळू वाहतुकीवर संयुक्त कारवाई

### ट्रॅक्टर-ट्रॉलीसह ६.०२ लाखांचा मुद्देमाल जप्त




**अक्षराज : जाफर शेख**

**दि.१०, बोरी (परभणी) :** बोरी येथील करपरा नदीपात्रातून अवैधरीत्या वाळूची वाहतूक करणाऱ्यांविरोधात स्थानिक गुन्हे शाखा, परभणी व बोरी पोलिसांनी संयुक्त कारवाई करत ट्रॅक्टर-ट्रॉलीसह तब्बल ६ लाख २ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी एका आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, करपरा नदीपात्रातून विनापरवाना वाळूची वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून कारवाई केली. यावेळी अजय मधुकरराव पवार (वय ३१, रा. आसेगाव, ता. जिंतूर, जि. परभणी) हा स्वराज कंपनीच्या लाल रंगाच्या ट्रॅक्टर-ट्रॉलीद्वारे अवैधरित्या वाळूची वाहतूक करताना आढळून आला.

तपासादरम्यान ट्रॅक्टर-ट्रॉलीमधील वाळू ही कोणत्याही वैध परवान्याशिवाय वाहून नेण्यात येत असल्याचे निष्पन्न झाले. तसेच सदर वाळूची बेकायदेशीर विक्री करण्याच्या उद्देशाने वाहतूक केली जात असल्याचेही उघड झाले. याप्रकरणी सिद्धेश्वर चाटे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा रजिस्टर क्रमांक ७७१/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३०३(२) तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील संबंधित कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार सिद्धार्थ कोकाटे करीत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या नेतृत्वाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे तसेच बोरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रामेश्वर धोंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

कारवाईत पोलीस उपनिरीक्षक चंदनसिंग परिहार, मुकेश बुधवंत, पांडुरंग तुकसुंदर, सिद्धेश्वर चाटे, नामदेव दुबे, गजेंद्र धारणे, राम पोड आणि रामप्रसाद कोकाटे यांनी सक्रिय सहभाग घेतला.

पोलिसांकडून अवैध वाळू उपसा व वाहतूक करणाऱ्यांविरोधातील मोहीम पुढेही अधिक तीव्रतेने सुरू राहणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

## निफाड तालुक्यात बिबट्यांची दहशत; टाकळी विंचूरमध्ये दोघांवर हल्ला

### खडकमाळेगावात ३ दिवसांत दुसरा बिबट्या जेरबंद!

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१०, विंचूर (नाशिक) :** निफाड तालुक्यात बिबट्यांचा वावर कमालीचा वाढला असून, खडकमाळेगाव येथे अवघ्या तीन दिवसांच्या कालावधीत कांदा चाळीत शिरलेला दुसरा बिबट्या जेरबंद करण्यात वन विभागाच्या पथकाला यश आले आहे. दरम्यान, टाकळी विंचूर येथेही एका बिबट्याने दोघांना जखमी केले असून, त्यालाही पकडण्यात आले आहे. या लागोपाठच्या घटनांमुळे परिसरात सध्या भीतीचे प्रचंड वातावरण निर्माण झाले आहे.

**तीन दिवसांत दुसरी मोठी कारवाई**

यापूर्वी शुक्रवार, ५ जून रोजी खडकमाळेगाव येथील एका पॉलिहाऊसमध्ये शिरलेल्या बिबट मादीला वन विभाग व निफाड बचाव पथकाने सुरक्षितरीत्या पकडून वनउद्यानात हलविले होते. ही घटना ताजी असतानाच, केवळ तीन दिवसांत पुन्हा एकदा खडकमाळेगाव येथेच दुसरा बिबट्या आढळून आला.

सोमवार, ८ जून रोजी येथील शेतकरी रामेश्वर शंकर शिंदे यांच्या मालकीच्या गट क्रमांक ७३१/३ मधील कांदा चाळीच्या जाळीत एक बिबट्या अडकल्याची माहिती वन विभागाला मिळाली. माहिती मिळताच वनपरिक्षेत्र अधिकारी राहुल घुगे, वनपरिमंडळ अधिकारी जयप्रकाश शिरसाठ व वनरक्षक विजय दोंदे यांच्या मार्गदर्शनाखाली निफाड व नाशिक वन्यजीव बचाव पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले.

बचाव पथकाची कामगिरी: पथकातील ज्ञानेश्वर पवार, सादिक शेख, वैभव दौंड, विजय माळी, काशिनाथ माळी, शरद चांदोरे, सागर दुसिंग व भारत माळी यांनी जीवाची पर्वा न करता तातडीने मोहीम राबवून या बिबट मादीला सुरक्षितरीत्या जेरबंद केले.

**टाकळी विंचूर येथे बिबट्याचा हल्ला; दोन जण जखमी**

खडकमाळेगाव येथील घटनास्थळापासून सुमारे एक किलोमीटर अंतरावर असलेल्या टाकळी विंचूर येथेही बिबट्याने थरार उडवून दिला. येथील संतोष सयाजी काळे यांच्या घराजवळील द्राक्षबागेत एका बिबट्याने दोन व्यक्तींवर हल्ला करून त्यांना किरकोळ जखमी केले. या घटनेनंतर वन विभागाने तिथेही तातडीने धाव घेत जाळीच्या साहाय्याने या बिबट्यालाही यशस्वीरीत्या पकडले.



**दोन्ही बिबट माद्यांवर उपचार सुरू**

लासलगाव येथील पशुवैद्यकीय अधिकारी (श्रेणी-१) डॉ.पूजा देशमुख यांच्या निरीक्षणाखाली पकडण्यात आलेल्या दोन्ही बिबट्यांवर वैद्यकीय उपचार करण्यात आले. वन विभागाने दिलेल्या माहितीनुसार, पकडण्यात आलेल्या दोन्ही बिबट माद्यांचे वय अंदाजे दोन ते अडीच वर्षे आहे. या दोन्ही बिबट माद्यांना शासकीय वाहनाद्वारे निफाड वनउद्यानात आणण्यात आले असून, पुढील कायदेशीर कार्यवाही सुरू आहे. मात्र, तालुक्यात बिबट्यांचा वाढता वावर पाहता शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

## मान्यताप्राप्त 'यूआयडी' नंबर असलेल्या शाळांमध्येच पाल्यांचे प्रवेश घ्या

### पालम गटशिक्षणाधिकाऱ्यांचे आवाहन



**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.१०, पालम (परभणी) :** अनधिकृत शाळांमध्ये प्रवेश घेऊन मुलांचे भविष्य धोक्यात घालू नका; अधिकृत शाळांची यादी पंचायत समितीत उपलब्ध असून नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होत असल्याच्या पार्श्वभूमीवर, पालम शहर व तालुक्यातील पालकांनी आपल्या मुलांचे प्रवेश (ॲडमिशन) घेताना विशेष काळजी घ्यावी. ज्या शाळांना शासनाची अधिकृत मान्यता आहे आणि ज्यांच्याकडे 'यू-डायस' (UDISE) क्रमांक उपलब्ध आहे, अशाच शाळांमध्ये आपल्या मुलांचे प्रवेश निश्चित करावेत, असे जाहीर आवाहन पालमचे गटशिक्षणाधिकारी सुभाष आमले यांनी केले आहे.

पालम तालुक्यात किंवा शहरात अनेक काही संस्था चालकांकडून आवश्यक त्या परवानग्या न घेताच शाळा किंवा वर्ग सुरू केले असतील . अशा अनधिकृत शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता असते. हे टाळण्यासाठी पालकांनी कोणत्याही भूलथापांना बळी न पडता, केवळ अधिकृत आणि शासकीय नियमांचे पालन करणाऱ्या शाळांचीच निवड करावी, जेणेकरून विद्यार्थ्यांचे भविष्य सुरक्षित राहील, असे आमले यांनी स्पष्ट केले. पालम तालुक्यामध्ये कोणत्या शाळा शासकीय नियमांनुसार अधिकृत आहेत आणि कोणत्या शाळांना शासनाची मंजुरी मिळालेली आहे, याची संपूर्ण अधिकृत यादी गटशिक्षण अधिकारी कार्यालय, पंचायत समिती पालम येथे नोटीस बोर्डावर लावण्यात आलेली आहे.

प्रवेश घेण्यापूर्वी पालकांनी या गोष्टी तपासाव्यात संबंधित शाळेला शासनाचे मान्यता प्रमाणपत्र मिळाले आहे का.? शाळेचा अधिकृत 'यू-डायस' (UDISE) किंवा यूआयडी नंबर काय आहे, शंका असल्यास पंचायत समितीच्या शिक्षण विभागाशी संपर्क साधावा.

पालकांनी प्रवेश निश्चित करण्यापूर्वी एकदा गटशिक्षण कार्यालयात येऊन अधिकृत यादीची खात्री करून घ्यावी, जेणेकरून विद्यार्थ्यांचे कोणतेही शैक्षणिक नुकसान होणार नाही, अशी माहिती शिक्षण विभागाच्या वतीने देण्यात आली आहे.

ज्या संस्था शासनमान्य किवा यूआयडी प्राप्त नाहीत किंवा नागरिकाकून जास्त फीस आकारत असेल तर अशा संस्थेवर कठोर कारवाई करण्यात येईल कारवाई करण्यात येईल असा इशारा गटशिक्षण अधिकारी सुभाष आमले यांनी दिला आहे.

## साईभक्तांच्या आरोग्याशी खेळणाऱ्यांची खैरे नाही ; तुकाराम मुंढेंचा धडाका!

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१०, शिर्डी (अहिल्यानगर) :** राज्याच्या अन्न व औषध प्रशासन विभागाची धुरा हाती घेतल्यानंतर आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांनी भेसळखोरांविरोधात गेल्या काही दिवसांपासून राज्यात अन्न व औषध प्रशासनाची राज्यव्यापी धडक कारवाई सुरू आहे. अन्नामध्ये भेसळ करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई केली जात आहे. या कारवाईत आत्तापर्यंत प्रशासनाने कोट्यावधी रुपयांचा माल जप्त केला आहे. अशातच साईबाबांच्या शिर्डीत देखील भाविकांच्या आरोग्याशी खेळ सुरू असल्याच्या तक्रारीनंतर अन्न व औषध प्रशासनाने, मंगळवारी शिर्डीत धाडसत्र राबवत पेढ्यांचे नमुने घेतले. तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधित दुकानदारांविरुद्ध कारवाई करणार असल्याचे अन्न व औषध प्रशासन विभागाकडून सांगण्यात आले.



साई मंदिर परिसरात पान, फुले व प्रसाद विक्रीची दुकाने आहेत. भक्तांना निकृष्ट दर्जाचा पेढा म्हणून प्रसाद देण्यात येतो. या पेढ्याच्या बॉक्सवर उत्पादन केल्याची व मुदत संपल्याची तारीख नसते. पेढ्याचा दर्जा भाविकांना माहित नसतांना तो दहा दिवस चालतो असे उत्तरे दुकानदार देतात. हा पेढा नेमका कुठे आणि कोण बनवतो याबाबत उल्लेखच नसल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. अक्षरशः दगडासारख्या पेढा प्रसाद म्हणून काही दुकानदारांकडून साईभक्तांना विक्री केली जातो. पॅकिंग केलेल्या पेढ्यांना बुरशी लागल्याचं देखील दिसून आले आहे.

शिर्डी नगरपालिकेसह अन्न व औषध प्रशासनाचे याकडे साफ दुर्लक्ष असल्याने निकृष्ट दर्जाच्या पेढ्यांमुळे साईभक्तांमध्ये तीव्र नाराजी होती. श्रद्धेच्या नावाखाली भाविकांच्या आरोग्याशी सुरू असलेला हा खेळ थांबणार तरी कधी? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

> **अनेक दुकानातून नमुने घेतले**
>
> शिर्डीत निकृष्ट दर्जाचे पेढे विकले जात असल्याच्या तक्रारीनंतर अन्न व औषध प्रशासन विभागाने प्रसाद दुकानांची तपासणी करत विकल्या जात असलेल्या पेढ्यांचे नमुने जमा केले. पेढ्यांचे नमुन्यांचा तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधित दुकानदारांवर कारवाई करण्यात येईल तक्रारींच्या अनुषंगाने तपासणी केली आहे. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई होईल.
>
> **– उज्ज्वल पाटील, अन्न सुरक्षा अधिकारी, अहिल्यानगर**

## संपादकीय



### साने गुरुजी

आज भारत मातेचे थोर सुपुत्र, स्वातंत्र्य सैनिक, समाजवादी विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते, मराठी साहित्यिक साने गुरुजी यांची पुण्यतिथी. साने गुरुजी यांचे पूर्ण नाव पांडुरंग सदाशिव साने. त्यांचा जन्म २४ डिसेंबर १८९९ रोजी कोकणातील पालगड येथे झाला. त्यांचे वडील सदाशिवराव हे पालगडचे खोत होते. लहानपणापासून साने गुरुजींचे त्यांच्या आईवर खूप प्रेम होते. त्यांच्यावर त्यांच्या आईच्या शिकवणुकीचा खूप प्रभाव होता. श्यामची आई या पुस्तकात त्यांनी आपल्या आईच्या साऱ्या आठवणी सांगितल्या आहेत. साने गुरुजींच्या आईने त्यांच्या बालमनावर जे संस्कार केले त्यातूनच त्यांचा जीवनविकास झाला. सर्वांवरती प्रेम करा हा धडा त्यांना त्यांच्या आईनेच दिला. साने गुरुजींचे मन अतिशय भावनाप्रधान व संस्कारक्षम होते. म्हणूनच आईने पेरलेल्या सदभावनांची वाढ त्यांच्या ठिकाणी लवकर झाली. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी अमळनेर येथील प्रताप हायस्कूलमध्ये काहीकाळ शिक्षक म्हणून नोकरी केली. प्रताप हायस्कूलच्या वसतिगृहाची जबाबदारी सांभाळताना त्यांच्यातील शिक्षकाला अधिक वाव मिळाला. त्यांनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना स्वाबलंबनाचे धडे दिले. सेवावृत्ती शिकवली. १९२८ साली त्यांनी विद्यार्थी हे मासिक सुरू केले. त्यानंतर त्यांनी विपुल लेखन केले. कादंबऱ्या, लेख, निबंध, काव्य, चरित्रे, नाट्यसंवाद अशा सर्व साहित्य प्रकारात त्यांची लेखणी अविरत चालली. त्यांच्या साहित्यात करुणा, स्नेह, प्रेम या गोष्टीचा वर्षाव झालेला आहे. त्यांच्या भाषेला एकप्रकारची धार आहे, बोध आहे. त्यांनी अतिशय साध्या आणि सोप्या शब्दात लेखन केल्याने लोकांना ते भावले. नाशिकच्या कारागृहात असताना त्यांनी श्यामची आई ही अजरामर कादंबरी लिहिली. धुळ्याच्या तुरुंगात त्यांनी विनोबा भावेंनी सांगितलेली गीताई लिहिली. साने गुरुजी थोर देशभक्त होते त्यांच्यावर महात्मा गांधींचा मोठा प्रभाव होता. ते स्वतः खादीचाच वापर करत. १९३० साली त्यांनी सविनय कायदेभंग आंदोलनात भाग घेतला त्यामुळे त्यांना तुरुंगवास भोगावा लागला होता. काँग्रेस नावाचे साप्ताहिक त्यांनी सुरू केले, दुष्काळात शेतकऱ्यांची करमाफी मिळावी यासाठीही त्यांनी आंदोलन केले होते. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात त्यांनी भाग घेतला. भूमिगत राहून स्वातंत्र्याचा प्रचार, राष्ट्र सेवा दलाचे कार्य या माध्यमातून त्यांनी राजकीय कार्य केले. पत्री या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहात त्यांनी अनेक देशभक्तीपर गीते लिहिली. त्यातील बलसागर भारत होवो... या गीताने तरुणांना स्फुरण चढले या गीताने प्रेरित होऊन हजारो तरुण स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले. या गीताचा वाढता प्रसार पाहून इंग्रज सरकारने या काव्यसंग्रहाच्या प्रती जप्त करुन या गीतावर बंदी आणली. साने गुरुजींना अस्पृश्यता, जातीपात, रूढी परंपरा, अंधश्रद्धा याविषयी कमालीची चीड होती. या गोष्टींना त्यांनी नेहमीच विरोध केला. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात दलितांनाही प्रवेश मिळावा यासाठी १९४६ साली त्यांनी महाराष्ट्राभर दौरा केला. त्यासाठी त्यांनी उपोषण केले त्यांच्या प्रयत्नांमुळेच पंढरपूरच्या विठ्ठलाचे मंदिर सर्वांसाठी खुले झाले. एका पांडुरंगाने दुसऱ्या पांडुरंगाला मुक्त केले असे त्यावेळी म्हटले गेले. स्वातंत्र्य मिळाल्यावर ते समाजवादी पक्षात सामील झाले. स्वातंत्र्यानंतर आंतरभारती चळवळीच्या माध्यमातून त्यांनी देश जोडण्याचा प्रयत्न केला. विविध राज्यातील लोकांनी एकमेकांची संस्कृती समजून घ्यावी, अनेक भाषा समजून घ्याव्यात असा उद्देश या चळवळीचा होता. त्यांनी स्वतः तामिळ व बंगाली या भाषा शिकल्या होत्या. १९४८ साली त्यांनी साधना हे मासिक सुरू केले. या मासिकांतून ते जनजागृती करू लागले. ११ जून १९५० रोजी त्यांचे दुःखद निधन झाले. साने गुरुजींना पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन.

**– श्याम ठाणेदार**

# देशातील तलाव वाचले पाहिजे...



केरळमध्ये मान्सून सक्रिय झाला आणि आठ दिवसांत तो विदर्भाची सीमा गाठेल. या मान्सूनच्या पूर्वतयारीला मात्र नागपूर महानगरपालिकेने कंबर कसली असून पर्यावरण संवर्धन पंधरवड्याचे निमित्त साधून शहरातील तलावांची स्वच्छता मोहिम हाती घेतली. निदान जलपर्णींनी वेढलेले तलाव आणि फिरणाऱ्या पर्यटकांनी केलेला कचरा तरी या मोहिमेतून काढला जाईल आणि शहरातील गुदमरलेले तलाव मुक्त श्वास घेऊ लागतील. त्यामुळे या मोहिमेचे स्वागतच करावे लागते.

वास्तविक तलाव म्हणजे शहरांचा श्वास आहे. संपूर्ण शहराची तहान भागविण्याचे काम हे तलाव करतात. त्यामुळे वेळोवेळी तलावांतील गाळ काढणे वगैरे कामे चोखपणे झाली तर शहरात पाण्याची वानवा राहत नाही. मात्र, तलावांची स्वच्छता हे दिवास्वप्नच ठरू नये म्हणजे झाले. पाण्याचे स्रोत असलेले हे तलाव अस्वच्छच होऊ नये हे जनतेच्या हातात आहे. त्यात घाणयुक्त पाणी, केरकचरा, प्लॅस्टिक आदी टाकलेच नाही तर महानगर पालिकेवर वारंवार स्वच्छता करण्याचा खर्चाचा भार पडणारच नाही. मात्र, घराला घर समजणारे आपण, बाहेर पडलो की हे शहर आपलं आहे, हा देश आपलाच आहे, येथली नैसर्गिक संपदा आपलीच आहे, हे विसरून जातो. वाटेल तशी घाण करून आपल्याला पोसणाऱ्या निसर्गाचा ऱ्हास करून टाकतो.

यंत्रणा कित्येकदा पाण्याचे स्रोत स्वच्छ करीत असले तरी आपणच त्यात घाण टाकतो आणि नंतर सरकारच्या नावाने बोटं मोडत बसतो, हे सत्य नाकारता येणारे नाही.

आता साधे कोल्हापूर येथील ऐतिहासिक रंकाळा तलावाचेच उदाहरण घ्या ना! कोल्हापुरचे वैभव असलेल्या ऐतिहासिक रंकाळा तलावात रंगीत कारंजे वगैरे बसवून पर्यटकांना आकर्षित केल्या जात असले तरी, प्रजासत्ताक सामाजिक संस्थेच्या मागणीवरून जेव्हा या तलावाची महानगर पालिका व प्रदूषण नियामक मंडळाने पाहणी केली असता त्यात केर कचऱ्याचे साम्राज्य आणि जलपर्णीचा घट्ट विळखा त्यांना दिसून आला. या जलपर्णीपासून काही वस्तू बनवून लोकांना रोजगार देण्याचा प्रयोग नागपुरात सुरू करण्यात आला आहे, हेही उत्तमच. पुढे तो इतरत्र वाढेलच. कोल्हापुरात रंकाळा तलावाला स्वच्छ ठेवण्याचे अनेक उपाय राबविले गेले. मात्र, पर्यटकांकडून टाकण्यात येणारे प्लॅस्टिक, पाण्याच्या बॉटल्स तसेच नागरिकांडून सोडण्यात येणारे घाण पाणी यामुळे ऑक्सिजनची पातळी कमी होऊन या तलावातील मासे मृतावस्थेत आढळून यायला लागले आहे. ज्या तलावात ऑक्सिजनचे प्रमाण कमी ते पाणी पिण्यालायक कसे राहील? नुकतेच नागपुरात झालेल्या जलक्रांती परिषद २०२६ च्या उद्घाटनात खुद्द केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी 'जलसंवर्धन हेच शेतकरी आत्महत्या रोखण्याची गुरुकिल्ली आहे ' असे म्हटले आहे. त्यामुळे जलसंवर्धन किती महत्त्वाचे आहे, हे आता प्रशासनाला तरी कळू लागले आहे.

त्यातल्या त्यात फुकट्या नागरिकांनी कित्येक तलावांच्या काठी अतिक्रमण करून शहरांना, गावांना पाणी पुरवठा करणारे तलाव गिळंकृत केले आहेत. याकडे जितके दुर्लक्ष सरकारने केले तितकाच गुन्हा नागरिकांचा सुद्धा ठरतो आहे. ज्याच्या भरवशावर आपली शेती आणि तहान अवलंबून आहे, ते तलावच जर आपण गिळंकृत करू लागलो तर भविष्यात पाण्याची गरज कशी भागवणार? भंडारा जिल्हा तर तलावाचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. मात्र, या जिल्ह्यातच आता तलाव नाहीसे व्हायला लागले आहेत.

एकेकाळी तब्बल १२० एकर क्षेत्रफळ असलेला भंडारा जिल्ह्यातील प्रसिद्ध मामा तलाव सध्या नागरिकांनी अतिक्रमण केल्याने फक्त ६५ एकरावर येऊन पोहचला आहे. यावर प्रशासनाने नक्कीच विचार करायला हवा. राज्यात सध्या सर्वत्र अतिक्रमण हटाव मोहीम सुरू असतांना सरकारच्या नाकावर टिच्चून काही स्वार्थी लोकं जर असेच पाणवठे गिळंकृत करत राहतील तर उद्या पाण्याची तीव्र टंचाई ठेवलीच आहे. एका माहितीनुसार सध्या भंडारा जिल्ह्यात ३६८६ तलाव असून एकट्या साकोली तालुक्यात १२०० हून अधिक तलाव आहेत. निदान हे तरी आता सुरक्षित असावेत यासाठी उपाययोजना करायला हवी. मात्र, जलयोद्धा पद्मश्री उमाशंकर यांनी दिलेली माहिती फारच भयावह आहे. देशातील एक दोन नव्हे तर तब्बल २५ लाख तलाव, १० हजार ५५० नद्या आणि एक कोटी विहिरी नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत, अशी भीषण परिस्थिती त्यांनी नागपुरातील जलसंवाद परिषदेत मांडली होती. यावरून देशातील पाण्याच्या स्रोतांची परिस्थिती लक्षात यायला लागते. जगातील केपटाऊन हे पाणी संपलेले पहिले शहर असून बेंगळुरू, दिल्ली , चेन्नई यासारख्या तब्बल ३१ प्रमुख शहरांतील पाणी संपत असल्याचा इशारा सुद्धा उमाशंकर यांनी यावेळी दिला आहे. या इशाऱ्यातील गर्भार्थ जर आपण उकलून बघितला तर कदाचित डोळे पांढरे येण्याची वेळ येईल. त्यामुळे वेळ असतांनाच पाण्याचे स्रोत असलेले तलाव वाचवायला हवे.

काही काळापूर्वी पाणी देणे ही सेवा होती. मात्र, वाढत्या पाणी टंचाईचा फायदा घेत आज पाण्याचा व्यवसाय झाला आहे. देशभरात एका मिनिटात २० हजार पाण्याच्या बॉटल्स विकल्या जात असेल तर येणाऱ्या दुष्काळाची नांदी डोळ्यांपुढे उभी राहते. एका माहितीनुसार संपूर्ण देशात केवळ ३२ टक्केच गोडे पाणी शिल्लक राहिलेले आहे.

पाणी वाचविण्यासाठी ज्याप्रमाणे आता रेन वॉटर हार्वेस्टिंग, शोषखड्डे, शेततळे यासारखे उपक्रम राबविल्या जाऊ लागले आहेत. त्याचप्रमाणे निसर्गाची देण असलेले तलाव सुद्धा वाचवायला हवे. तेथील अतिक्रमण काढून तलावांना मोकळे करायला हवे. त्यात कचरा टाकणाऱ्या नागरिकांवर कठोर दंड आकारला गेला पाहिजे. धोरणात जोपर्यंत कडक शिस्त येत नाही, तोवर कुठल्या वस्तूची किंमत नागरिकांना कळत नाही. जिथे शासकीय जमिनी पडीक आहेत, तिथे कुणी अतिक्रमण करण्यापेक्षा तिथे नव्याने तलाव खोदले पाहिजे. तलावातील गाळ वेळोवेळी काढून त्याची पाणीभरण क्षमता वाढवायला पाहिजे, तेव्हाच येणाऱ्या काळातील पाणी टंचाईला आपण तोंड देऊ शकू. अन्यथा देशाचे वाळवंट व्हायला वेळ लागणार नाही.

**– लीलाधर दवंडे**
**कामठी (नागपूर)**
**मो.८४१२८७७२२०**

### आरंभ पावसाळ्याचा

मृग नक्षत्राच्या प्रारंभाला
सरायचा रखरखीत उन्हाळा
कळता खबर मान्सूनची
हळूच येत असे पावसाळा

दिशा वाऱ्याची बदलली की
गर्दी नभात काळ्या ढगांची
झुळूक येई थंड वाऱ्याची
कोसळायची सर पावसाची

ढग जमू लागले एकत्र की
अंधारून येई सगळीकडे
मुसळधार पाऊस पडायचा
थंडावा पसरे चोहिकडे

दिसता मिरगाचे लाल किडे
पेरणीची लगबग चालायची
बळीराजाच्या हाती तिफण
धनीन मागे सरतं धरायची

काळेकुट्ट ढग येत सांच्याला
रात्रभर पाऊस कोसळायचा
भिंत अन् पत्राच्या फटीतून
अंथरूण ओले करायचा

घरात ठिबकणाऱ्या धारेखाली
आई परात,डेचकी ठेवायची
चिल्या पिल्यांना शांत झोपवून
रात्रभर बिचारी जागायची

पहिल्या पावसाच्या पाण्याने
रानभाज्या कोवळ्या उगवायच्या
शेत शिवारात हिंडून दिवसभर
आयाबाया खुडून त्या आणायच्या

**– बबन दामोदर गुळवे**
**लातूर मो.९७३०९३९७३२**

# मुलांवर हिंदू धर्माचे संस्कार बालपणीच करा !

लग्नाचे आमिष दाखवून एका हिंदू मॉडेल तरुणीचा १० वर्षे शारीरिक आणि मानसिक छळ करून तिच्याकडून ५० ते ६० लाख रुपये उकळल्याची घटना नुकतीच वाचनात आली. उत्तर प्रदेशहून मॉडेलिंगसाठी सुरुवातीला दिल्लीत आणि नंतर मुंबईत आलेल्या पीडित तरुणीची ओळख उत्तर प्रदेशातील सरधना येथील निवासी असलेल्या वासिल या मुस्लिम तरुणाशी झाली. वासिलने मॉडेल तरुणीशी जवळीक वाढवली. तिला लग्नाचे आमिष दाखवून तिच्याशी शरीरसंबंध ठेवले. तरुणी गर्भवती राहिल्यावर मात्र समाजात बदनामी होईल असे सांगून त्याने लग्नाला नकार दिला. मॉडेलिंगमधून मिळणाऱ्या पैशातील मोठा वाटा तिला वासिलच्या कुटुंबाला द्यावा लागत होता.

वासिल सोबतच्या १० वर्षांच्या सहवासात तिला वासिलने ३ वेळा गर्भपात करण्यास भाग पाडण्यात आले. या कालावधीत वासिलच्या कुटुंबाने पिडीतेकडून ५० ते ६० लाख रुपये उकळले तसेच तिच्यावर अनेकदा धर्मांतर करण्यास दबाव टाकला. हिंदू समाजाला पोखरत चाललेले लव्ह जिहादचे हे केवळ एक उजेडात आलेले उदाहरण आहे. आजमितीला लव्ह जिहादची वाळवी देशभरात झपाट्याने पसरत आहे. 'मेरा अब्दुल वैसा नही' म्हणत असंख्य सुशिक्षित तरुणी या जिहादला बळी पडत चालल्या आहेत.

इम्प्रेस करून आणि लग्नाचे आमिष दाखवून, तर कधी स्वतःची ओळख लपवून या रॅकेटमध्ये काम करणाऱ्या जिहाद्यांकडून हिंदू मुलींना टार्गेट केले जाते, त्यांचा उपभोग घेतला जातो, व्हिडीओ शूटिंग करून त्यांना ब्लॅकमेल केले जाते, मित्रांसोबत संबंध ठेवण्यास भाग पाडले जाते, धर्मांतर करण्यास जोरजबरदस्ती केली जाते, गोमांस खायला आणि नमाज पढायला दबाव टाकला जातो, आधीचे लग्न, मुले यांविषयीची माहिती लपवून दुसरा निकाह केला जातो, तिच्याद्वारे मुले जन्माला घातली जातात. या सर्वांना विरोध करणाऱ्या हिंदू मुलींना एकतर ठार केले जाते नाहीतर कुंटणखान्यात विकले जाते, अशी एक नव्हे तर लाखो प्रकरणे देशभरात घडली आहेत. हे षडयंत्र कसे कार्य करते.



याबाबत सविस्तर माहिती देणारे व्हिडीओज, लेख आज गूगलवर उपलब्ध आहेत तरीही या षड्यंत्राला बळी पडणाऱ्या मुलींची संख्या काही कमी होताना दिसत नाही. आजतागायत बॉलिवूडमधून, दूरदर्शन मालिकांतून आणि वेब सिरीजमधुन एका समाजाला सातत्याने झुकते माप देण्यात आहे परिणाम त्या समाजाविषयी लोकांच्या मनात कमालीचा सॉफ्ट कॉर्नर तयार झालेला आहे ज्याची परिणीती म्हणून त्या समाजातील तरुणांवर पटकन विश्वास ठेवून हिंदू मुली त्यांच्या प्रलोभनांना बळी पडतात. हिंदू मुलींना जाळ्यात ओढण्यासाठी काळ्या जादूचा उपयोग केला गेल्याचेही काही प्रकरणात उघड झाले आहे. या षडयंत्रामध्ये आता मुलीही मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्या असून या जिहाद अंतर्गत काम करणाऱ्या तरुण तरुणींना लाखो रुपये मिळत असल्याचेही तपासातून निष्पन्न झाले आहे. हिंदू धर्माचा वंशविच्छेद करू पाहणाऱ्या या षडयंत्राचा वेळोवेळी पर्दाफाश होऊनही हिंदू मुली त्यास बळी पडण्यामागे महत्वाचे कारण म्हणजे हिंदू मुलींना त्यांच्या घरातून हिंदू धर्माविषयी कोणतेही ज्ञान अथवा शिक्षण दिले जात नाही.

आजमितीला हिंदू धर्माची महती साता समुद्रापार पोहोचली आहे त्यामुळे धर्माचे ज्ञान घेण्यासाठी आणि येथील संस्कृती जवळून अनुभवण्यासाठी दरवर्षी हजारो विदेशी पर्यटक भारतात येतात. इथे येऊन ते तीर्थक्षेत्री यज्ञयागादि धार्मिक विधी, तसेच पूर्वजांचे श्राद्ध वगैरे करतात. हिंदू धर्माचे माहात्म्य कळल्यावर, कधी न अनुभवलेल्या शांतीची अनुभूती घेतल्यावर कितीतरी जण मोहमायेचा त्याग करून इथेच एखाद्या आश्रमात अथवा मंदिरात राहून आपला उर्वरित काळ भगवंताच्या सानिध्यात व्यतीत करतात.

पूर्वी आजी आजोबा तसेच घरातील वरिष्ठ मंडळींकडून हिंदू धर्मातील देवता, अवतार, प्रथा, परंपरा, धार्मिक विधी, सण, उत्सव, संस्कार आदींची महती लहानग्यांना उदाहरणासहित सांगितली जात असे त्यामुळे बालपणापासून त्यांना हिंदू धर्मात जन्म घेतल्याचा अभिमान असे. आता मात्र आजी आजोबा गावच्या घरी आणि आणि आई बाबा ऑफिसला जाणाऱ्या पाल्यांची वाढ ही बालसंगोपन केंद्रातच होते. अशा मुलांवर धार्मिक संस्कार होणार तरी कसे. आपल्या मुलींना आणि मुलांना अशा प्रकारच्या जिहादी प्रवृत्तींपासून वाचवायचे असेल तर त्यांच्यावर बालपणापासून हिंदू धर्माचे संस्कार करायला हवेत.

**– सौ. मोक्षदा घाणेकर.**
**काळाचौकी, मुंबई**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## अ.भा.ओबीसी सेवा संघटनेच्या राज्य नवनिर्वाचित कोअर कमिटीची एक मताने निवड

**अक्षराज : वृत्तसेवा**

**दि.०९ पुणे :** महायुती सरकार मध्ये अधिकृत घटक पक्ष संघटना म्हणून कार्यरत असलेला अखिल भारतीय ओबीसी सेवा संघाचे अध्यक्ष हनुमंतजी सुतार यांच्या आदेशानुसार महाराष्ट्र राज्याचे कार्याध्यक्ष प्रा.नानासाहेब टेंगले यांनी अखिल भारतीय ओबीसी सेवा संघटनेच्या महाराष्ट्र कोअर कमिटीच्या सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांची खालील प्रमाणे नियुक्ती जाहीर केली.

(अध्यक्ष) हनुमंत सुतार, संस्थापक अध्यक्ष नानासाहेब टेंगले, कार्याध्यक्ष महाराष्ट्र राज्य, डॉ.शाम हरी जाधव उपाध्यक्ष (नाशिक), प्रवीण चव्हाण मुंबई अध्यक्ष, वंदना कुमावत प्रवक्त्या महाराष्ट्र राज्य (पुणे), गौरी गुरव सरचिटणीस महाराष्ट्र राज्य (सातारा), नंदा बागुल खजिनदार महाराष्ट्र राज्य (अहिल्यानगर), स्मिता गुरव सरचिटणीस पश्चिम महाराष्ट्र (कोल्हापूर), कुमारी आकांक्षा कुंभार, प्रदेश अध्यक्ष सांस्कृतिक आघाडी (सांगली )वरील सर्व मान्यवरांचे महाराष्ट्र कमिटी कोअर कमिटी यांचे अभिनंदन होत असून वरील कमिटी तर मनापासून अखिल भारतीय ओबीसी सेवा संघ महाराष्ट्र राज्य सदैव कार्याकडे लक्ष देऊन आपले कार्य पुढे चालू राहील अशी ग्वाही महाराष्ट्र कोअर कमिटीच्या वतीने देण्यात येत आहे.

## "कापूस उत्पादकता अभियान (कपास क्रांती)" प्रात्यक्षिकासाठी शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी तसेच कृषी क्षेत्रात कार्यरत सहकारी संस्थानी ऑनलाईन अर्ज करावा

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१०,** पोंभूर्णा (चंद्रपूर) : पोंभूर्णा तालुक्यातील शेतकरी बांधवांसाठी केंद्र पुरस्कृत कापूस उत्पादकता अभियान (कपास क्रांती) योजना शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, कापूस पिकाची उत्पादकता व गुणवत्ता सुधारणा करणे तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार करण्याच्या उद्देशाने पुरस्कृत कापूस २ उत्पादकता अभियान (कपास क्रांती) योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत विविध पीक प्रात्यक्षिके घेण्यात येत असून शेतकऱ्यांना सुधारित शेती तंत्रज्ञानाची माहिती प्रत्यक्ष शेतावर उपलब्ध करून देण्यात येत आहे. एल-निनो हवामान अंदाजाचे संभाव्य दुष्काळी परिस्थितीमुळे सध्या कपाशी बियाण्याची बेडवर लागवड तसेच मुलस्थानी जलसंधारणाचे उपचार राबविणे आवश्यक आहे. तसेच यामध्ये क्लोजर स्पेसिंग पद्धतीद्वारे कापूस लागवड (९० बाय ३० सेमी.), सघन कापूस उडीद लागवड (९० बाय १५ सेमी.) तसेच एकात्मिक पीक व्यवस्थापन (९० बाय ६० सेमी.) अंतर्गत आंतरपिके प्रात्यक्षिके घेण्यात येत आहेत. आंतरपिकांमध्ये मुग, व चवळी या पिकांचा समावेश करण्यात

आलेला आहे. क्लोजर स्पेसिंग व सघन कापूस लागवड तंत्रामुळे प्रति हेक्टर झाडांची संख्या वाढून अधिक उत्पादन मिळण्यास मदत होते. तसेच आधुनिक व्यवस्थापन पद्धतींचा अवलंब केल्यामुळे कीड व रोग नियंत्रण, पाणी व्यवस्थापन आणि खतांचा संतुलित वापर शक्य होत आहे. एकात्मिक पीक व्यवस्थापन अंतर्गत मुग व उडीद या आंतरपिकांचा समावेश केल्यामुळे जमिनीची सुपीकता वाढण्यास मदत होते तसेच शेतकऱ्यांना अतिरिक्त आर्थिक उत्पन्नाचा स्रोत उपलब्ध होतो. यामुळे पीक विविधीकरणास चालना मिळून

हवामान बदलाच्या परिस्थितीत जोखीम कमी करण्यास मदत होत आहे. सदर प्रात्यक्षिकांद्वारे शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान, सुधारित बियाणे, संतुलित खत व्यवस्थापन, एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन याबाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे. तरी महाडीबीटी पोर्टलवर (https://mahadbt. maharashtra. gov.in/Farmer/AgriLogin अर्जाची विंडो उपलब्ध असून तालुक्यातील पात्र शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी तसेच कृषी क्षेत्रात कार्यरत सहकारी संस्था यांनी लवकारात लवकर अर्ज

करावेत. मागील दोन वर्षात पीक प्रात्यक्षिकांचा योजनें अतर्गत लाभ घेतला असल्यास त्यांची यावर्षी लाभासाठी निवड केली जाणार नाही. शेतकरी गट / कंपनी मधील केवळ फार्मर आयडी असलेले शेतकरी सदस्य लाभासाठी पात्र असणार आहेत. तरी अधिक माहितीसाठी संबंधित गावाचे सहाय्यक कृषी अधिकारी, उप कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी व तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन तालुका कृषी अधिकारी श्रीमती स्वाती एम. ढोबळे यांनी केले आहे.

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त फळझाडे रोपे वितरण




**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.१०, खंडाळा (सातारा) :** जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून निप्रो फार्मा पॅकेजिंग इंडिया प्रा. लि. यांच्यावतीने नुकतेच फळझाडे रोपे वितरण उपक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात कर्मचाऱ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला असून त्यांना घर व परिसरात वृक्षारोपण करण्यासाठी फळझाडांची विनामूल्य रोपे देण्यात आली. तसेच सामाजिक बांधिलकी जपत ग्रामपंचायत भादे येथील शेतकऱ्यांनाही रोपांचे वितरण करण्यात आले. कंपनीच्या वतीने हा उपक्रम पर्यावरण संवर्धन, शाश्वत विकास (Sustainability) आणि हरित परिसर निर्माण करण्याच्या दीर्घकालीन धोरणाचा एक भाग म्हणून राबविण्यात आला. उद्योग व पर्यावरण यामध्ये संतुलन राखत समाजाशी जोडलेले राहण्याचा कंपनीचा प्रयत्न यामधून अधोरेखित झाला.

यावेळी धनाजीराव जाधव (असिस्टंट मॅनेजर – EHS) यांनी पर्यावरण संवर्धन, वृक्षारोपण, कचरा व्यवस्थापन व ऊर्जा बचत यांचे महत्त्व पटवून देत प्रत्येकाने पर्यावरण संरक्षणासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. या कार्यक्रमास कंपनीतर्फे संदीप गडाख, तेजस्विनी बावधाने,मनाली प्रमाने, अंकिता बाबर तसेच ज्ञानेश्वर कुंभार उपस्थित होते. तसेच खंडाळा तालुका विकास प्रतिष्ठान सचिव डॉ. विजय शिंदे जि.प.सदस्य संतोष साळुंखे,सरपंच निलांबरी बुनगे राष्ट्रवादी नेते संभाजी साळुंखे व शेतकरी यांची विशेष उपस्थिती होती.

# विकासकामांतून जनतेच्या समृद्धीची गुंतवणूक : आ. काशिनाथ दाते



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१०, पारनेर (अहिल्यानगर) :** मतदारसंघातील विविध विकासकामांसाठी खर्च होणाऱ्या निधीतून ग्रामीण भागातील जनतेच्या समृद्धीची गुंतवणूक होत असल्याचे प्रतिपादन आमदार काशिनाथ दाते यांनी केले.

विविध विकासकामांच्या माध्यमातून पायभूत सुविधा आणि जलसंधारणाला बळ मिळत असल्याचे आमदार दाते म्हणाले. बाभुळवाडे - दरोडी रस्त्याच्या मुरुमीकरणाचे आणि बाबुळवाडे येथे उभारण्यात आलेल्या कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याचे भूमिपूजन आमदार दाते यांच्या हस्ते झाले, यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

या प्रसंगी भाजप राज्य कार्यकारिणीचे सदस्य विश्वनाथ कोरडे, माजी जिल्हा परिषद सदस्य वसंतराव चेडे, प्रशांत जगदाळे, देवेंद्र जगदाळे, डॉ. सुरेश खणकर, विशाल खणकर, मनसुख कोरडे, दिगंबर जगदाळे, जयराम जगदाळे, प्रमोद खणकर, वसंत मातेरे, अच्युतराव जगदाळे, दत्तात्रय जगदाळे, भिवाजी जगदाळे, निशिगंधा बोरुडे, भाऊसाहेब जगदाळे, बबन शिर्के, महादू जगदाळे, संतोष बोरुडे, निशिगंधा बोरुडे, रेवणनाथ खणकर, शरद जगदाळे, अविनाश जगदाळे, दत्तात्रय क्षीरसागर, उत्तम जगदाळे, जय शिर्के, भाऊ खोडदे, भाऊ पटाडे यांच्यासह स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आमदार दाते म्हणाले की, ग्रामीण विकासाचा पाया मजबूत करायचा असेल तर रस्ते, पाणी आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील आहोत. विकास कामे ही केवळ निधीची नव्हे तर जनतेच्या विश्वासाची आणि भविष्यातील समृद्धीची गुंतवणूक असल्याचे आमदार दाते म्हणाले.

बाभुळवाडे- दरोडी दरम्यानच्या रस्त्याच्या कामामुळे या पंचक्रोशीतील दळणवळण व्यवस्था सक्षम होणार आहे. तर बाभुळवाडे येथिल बंधाऱ्यामुळे जलसंधारणाबरोबरच भूजल पातळी वाढण्यास मदत होईल. रस्त्याच्या कामामुळे परिसरातील शेतकरी, विद्यार्थी, नागरिक आणि वाहनधारकांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे आमदार दाते म्हणाले.

> बाभुळवाडा परिसरातील रस्ता मुरुमीकरण आणि कोल्हापूर पद्धतीचा बंधारा ही दोन्ही कामे बाभुळवाडे परिसराच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाची आहेत. आमदार काशिनाथ दाते यांनी मतदारसंघातील मूलभूत प्रश्नांना प्राधान्य देत विकासकामांना गती दिली आहे. विशेषतः जलसंधारण आणि रस्ते विकासामुळे शेतकरी, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठा लाभ होणार आहे. जनतेच्या अपेक्षा लक्षात घेऊन विकासाचा निधी गावागावांत पोहोचविण्याचे काम आ. दाते सातत्याने करत आहेत.
>
> **– वसंतराव चेडे, माजी जिल्हा परिषद सदस्य**

# तौहीद खान हत्या प्रकरण तापले; आरोपींवर 'मोक्का' लावण्याची मागणी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१०, परळी (बीड) :** परळी (जि.बीड) येथील तौहीद खान या मुस्लिम तरुणाच्या निर्घृण हत्येप्रकरणी राज्यभरातून संताप व्यक्त होत असताना, मुस्लिम अधिकार परिषदने या प्रकरणातील सर्व आरोपींवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मोक्का) अंतर्गत कारवाई करण्याची तसेच पीडित कुटुंबाला तातडीने २५ लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर करण्याची जोरदार मागणी केली आहे.

मंगळवारी संघटनेच्या शिष्टमंडळाने परभणी येथील निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी यांची भेट घेऊन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावे निवेदन सादर केले. यावेळी तौहीद खान हत्या प्रकरणाची सखोल आणि निष्पक्ष चौकशी करून गुन्ह्यातील सर्व संबंधित आरोपींना कठोर शिक्षा देण्याची मागणी करण्यात आली. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, या प्रकरणात आतापर्यंत दोन



## पीडित कुटुंबाला २५ लाखांची मदत द्यावी...

आरोपींना अटक करण्यात आली असली तरी संपूर्ण कटामध्ये आणखी काही व्यक्तींचा सहभाग असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

हत्येशी संबंधित कथित ऑडिओ क्लिप सोशल मीडियावर व्हायरल होत असून, त्यामध्ये गुन्ह्याचे समर्थन करण्यात आल्याचे आरोप आहेत. त्यामुळे केवळ अटक झालेल्या आरोपींपुरती चौकशी मर्यादित न ठेवता संपूर्ण कटाचा उलगडा करण्यासाठी उच्चस्तरीय तपास यंत्रणेमार्फत चौकशी करण्यात यावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.

संघटनेने निवेदनाद्वारे सर्व आरोपी व त्यांच्या कथित पाठीराख्यांना तातडीने अटक करणे, गुन्ह्यातील आरोपींवर मोक्का अंतर्गत कारवाई करणे, खटला जलदगती न्यायालयात चालविणे आणि पीडित कुटुंबाला २५ लाख रुपयांची आर्थिक मदत देणे या प्रमुख मागण्या मांडल्या आहेत.मुस्लिम अधिकार परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, तौहीद खान हत्या प्रकरण हे अत्यंत गंभीर स्वरूपाचे असून या घटनेमुळे समाजात भीती आणि अस्वस्थतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

त्यामुळे शासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन दोषींना कठोर शिक्षा देण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत, अशी मागणी करण्यात आली.यावेळी संघटनेचे अध्यक्ष वहीद पटेल, नगरसेवक इमरान खान, ॲड. असरार अहमद, शेख सुलेमान, सय्यद इरशाद अली, हाफिज आवेस, शेख सईद हुसैन, आबेद मुल्ला, शेख यूनुस, शेख सैफ अहमद, साजिद बेलदार, मोहम्मद जुनैद, रहीम तांबोळी, शेख शहजाद, शेख मुज्जमिल, शेख अलीम, यामीन पटेल, शेख निहाल आदी उपस्थित होते.तौहीद खानला न्याय मिळालाच पाहिजे; आरोपींवर मोक्का लावून कठोर कारवाई करा आणि पीडित कुटुंबाला तातडीने आर्थिक मदत द्या, अशी ठाम भूमिका मुस्लिम अधिकार परिषदने घेतली आहे.

# कोक गावातील दूषित पाणी प्रकरण: मानवाधिकार आयोगाची तिन्ही अधिकाऱ्यांना नोटीस

## २२२ नागरिकांच्या आरोग्याशी खेळल्याचा आरोप!

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१०, जिंतूर :** तालुक्यातील कोक गावात दूषित पाण्यामुळे तब्बल २२२ नागरिकांची तब्येत बिघडल्याच्या प्रकरणी महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाने अखेर दखल घेतली आहे. या प्रकरणी शेख नदीम शेख कलीम यांनी केलेल्या तक्रारीनंतर आयोगाने परभणी जिल्ह्यातील तीन वरिष्ठ अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

**काय आहे प्रकरण?**

गावातील पाणी पिण्यास अयोग्य त्यानुसार, कोक गावात ग्रामपंचायतीच्या जुन्या विहिरीतून व टाकीतून पुरवलेल्या दूषित पाण्यामुळे १३ ऑक्टोबर रोजी २२२ नागरिकांना अतिसार, उलट्या, पोटदुखीचा त्रास झाला होता. जिल्हा सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेच्या अहवालातही पाण्यात 'अयोग्य घटक' आढळले होते.

**मानवाधिकार आयोगाची दखल**

याच प्रकरणी शेख नदीम शेख कलीम यांनी १९ ऑक्टोबर २०२५ रोजीच आयोगाकडे तक्रार दाखल केली होती. या तक्रारीची गंभीर दखल घेत आयोगाचे सदस्य मा. संजय कुमार यांच्या खंडपीठाने २ जून २०२६ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. परभणी, पोलीस अधीक्षक परभणी आणि सिव्हिल सर्जन यांना नोटीस बजावली आहे.

**२३ जुलैला सुनावणी...**

आयोगाने तिन्ही अधिकाऱ्यांना २३ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता या प्रकरणाचा सविस्तर अहवाल दोन प्रतींमध्ये सादर करण्याचे आदेश दिले आहेत. अहवालासंबंधी प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी जबाबदार अधिकाऱ्याने व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे हजर राहावे, असेही नोटीसमध्ये नमूद आहे.

**न्याय मिळेल – रहीम कोक्कर**

या प्रकरणी पाठपुरावा करणारे सामाजिक कार्यकर्ते रहीम कोक्कर यांनी प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, आम्ही केलेल्या पाठपुराव्याला न्याय भेटेल आणि २२२ लोकांच्या जीवाशी खेळणाऱ्या लोकांनवर कारवाई शासन नक्कीच करेल.

'सातत्याने या प्रकरणाचा पाठपुरावा केल्याने आता दोषींवर कारवाई होण्याची आशा ग्रामस्थांना निर्माण झाली आहे. २३ जुलैच्या सुनावणीत अधिकारी काय अहवाल देतात याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# आधिक मासानिमित्त तहसीलदारांचा अंजनाई गोशाळेत गोपूजन व वृक्षारोपण

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१० सोयगाव :** आधिक मासानिमित्त तहसीलदार मनिषा मेने-जोगदंड यांनी आमखेडा येथील क्रांती जनहित बहुउद्देशीय विकास संस्था संचालित अंजनाई गोशाळेला बुधवारी (दि.१०) सायंकाळी भेट देऊन गोमातेचे पूजन केले. यावेळी त्यांनी गोमातांना फळांचा आहार खाऊ घालत गोसेवेप्रती आपली श्रद्धा व्यक्त केली. गोशाळा परिसरात तहसीलदार मेने-जोगदंड यांच्या हस्ते वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. तसेच संस्थेच्या वतीने त्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. संस्थेच्या कोषाध्यक्षा उर्मिला इंगळे यांच्या हस्ते हा सत्कार करण्यात आला.




यावेळी नायब तहसीलदार संभाजीराव देशमुख, क्रांती जनहित बहुउद्देशीय विकास संस्थेचे अध्यक्ष संदीप इंगळे, उपाध्यक्ष ईश्वर इंगळे, सचिव दिलीप शिंदे, सहसचिव अनिल लोखंडे, कोषाध्यक्ष उर्मिला इंगळे, सदस्या पद्माबाई शिंदे, रुपाली लोखंडे, शारदा इंगळे, मीना गाडेकर तसेच सदस्य ज्ञानेश्वर गाडेकर, राम बोडखे, ज्ञानेश्वर जाधव, राहुल जयवळ, योगेश चौधरी, केतन शिंदे, अथर्व इंगळे, गौरव हिरे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी संस्थेचे उपाध्यक्ष ईश्वर इंगळे यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

## पारनेरमध्ये सरकारच्या फसव्या कर्जमाफी विरोधात सर्वपक्षीयांची वज्रमूठ

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१०, पारनेर (अहिल्यानगर) :** राज्य सरकारने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफीसाठी काढलेला शासन आदेश फसवा आहे. कर्जमाफी आदेशात अत्यंत जाचक अटी शर्ती लावून मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांना लाभापासून वंचित ठेवण्यात आले आहे. त्यामुळे ही योजना प्रत्यक्षात कर्जमाफी नसून कर्ज वसुली योजना असल्याची भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केल्या आहेत.

निवडणुकीपूर्वी राज्यातील शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफीचे आश्वासन देण्यात आले होते. दोन लाखांपर्यंतचे कर्ज माफ करण्याचे जाहीरपणे सांगितले होते. मात्र, प्रत्यक्षात शासन निर्णयात विविध निकष आणि अटी लावून लाखो शेतकऱ्यांना कर्जमाफीसाठी दुर ठेवण्याचा प्रयत्न केला जात आहे.

राज्यातील ५ टक्केच शेतकऱ्यांना या कर्जमाफीचा फायदा होणार असून उर्वरित ९५ टक्के शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहणार आहे. फडणवीस सरकारने केलेली ही कर्जमाफी फसवी असून या विरोधात पारनेर तालुक्यातील भूमिपुत्र शेतकरी संघटना, शिवबा संघटना, निलेश लंके प्रतिष्ठान, भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन, उद्धव ठाकरे गट,



शिवसेना, संभाजी ब्रिगेड, भाजप, राष्ट्रवादी, मनसे, युवा सेना, शेतकरी सेना, कॉँग्रेस, शरद पवार गट, आमची माती आमची माणस या सर्वपक्षीय व संघटना एकत्रित येत दि.१० जून २०२६ रोजी प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत शासकीय विश्रामगृहात बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीत फडणवीस सरकारने शेतकऱ्यांची फसवणूक केल्याने भव्य आंदोलन उभारण्याचा निर्णय घेतला आहे. तहसील कार्यालयावर लवकरच निषेध मोर्चा काढून शासन निर्णयाची सर्वपक्षीय व संघटनांच्या वतीने जाहीर होळी करण्यात येईल. तसेच त्यानंतर खासदार निलेश लंके व आमदार काशिनाथ दाते यांना निवेदन देण्यात येईल.

शासनाच्या कर्जमाफीतील समितीच्या एका प्रमुखाशी मंत्रालयात बैठक लावण्यासाठी आमदार काशिनाथ दाते यांना आग्रह धरणार असल्याचे या सर्वपक्षीय बैठकीत ठरले असून फसव्या कर्जमाफीच्या विरोधात पारनेर तालुक्यातील सर्व पक्षीय व संघटना एकत्रित आल्याने पुढील काळात मोठं जन आंदोलन पेटणार असल्याची चिन्हे दिसत आहेत. या बैठकीत सर्वपक्षीय नेत्यांनी आप आपले झेंडे बाजूला सारून थेट शेतकऱ्यांच्या हितासाठी एकत्र येत वज्रमूठ दाखवली आहे.

## महाबळेश्वरचे नगराध्यक्ष शिंदे यांची 'पश्चिम महाराष्ट्र नगर परिषदा महासंघ'च्या उपाध्यक्षपदी निवड

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.१०, महाबळेश्वर (सातारा) :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून विकासाची नवी दिशा देणारे आणि महाबळेश्वर शहराच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सातत्याने कार्यरत असलेले महाबळेश्वरचे नगराध्यक्ष सुनील लक्ष्मण शिंदे यांची 'पश्चिम महाराष्ट्र नगर परिषदा महासंघ'च्या उपाध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. महासंघाच्या नुकत्याच पार पडलेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत ही घोषणा करण्यात आली.

सुनील शिंदे यांच्या निवडीमुळे पश्चिम महाराष्ट्रातील नगर परिषदांच्या संघटनात्मक बळकटीसह महाबळेश्वर शहराला प्रादेशिक स्तरावर अधिक प्रभावी नेतृत्व मिळाले आहे. त्यांच्या या निवडीबद्दल विविध राजकीय, सामाजिक



आणि प्रशासकीय क्षेत्रांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

**अनुभव, नेतृत्व आणि विकासाभिमुख कार्यपद्धती**

महाबळेश्वर नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत जनतेतून थेट भरघोस मतांनी निवडून आलेले सुनील शिंदे हे संयमी नेतृत्व, सर्वसमावेशक दृष्टीकोन आणि विकासकामे तळागाळापर्यंत पोहोचवण्याच्या कार्यपद्धतीसाठी ओळखले जातात. शहरातील मूलभूत सुविधा, स्वच्छता, पर्यटन विकास आणि नागरी प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांची दखल घेत महासंघाने त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे.

पर्यटननगरी महाबळेश्वरचा नियोजनबद्ध विकास करताना त्यांनी दाखवलेले प्रशासकीय कौशल्य आणि लोकाभिमुख निर्णयप्रक्रिया हे त्यांच्या निवडीमागील प्रमुख कारण मानले जात आहे.

निवडीनंतर बोलताना सुनील शिंदे म्हणाले, पश्चिम महाराष्ट्र नगर परिषदा महासंघाने माझ्यावर दाखवलेला विश्वास सार्थ ठरवण्यासाठी मी कटिबद्ध राहीन. महासंघाच्या माध्यमातून पश्चिम महाराष्ट्रातील सर्व लहान-मोठ्या नगर परिषदांचे प्रलंबित प्रश्न, विकास आराखडे आणि कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी प्राधान्याने प्रयत्न करेन. महाबळेश्वरच्या जनतेने आणि पक्ष नेतृत्वाने दिलेल्या पाठबळामुळेच मला हा बहुमान मिळाला आहे.

**महाबळेश्वरसाठी अभिमानाची बाब**

सुनील शिंदे यांच्या या निवडीमुळे महाबळेश्वर शहराच्या विकासविषयक प्रश्नांना व्यापक व्यासपीठ मिळणार असून, पश्चिम महाराष्ट्रातील नगर परिषदांच्या विविध प्रश्नांच्या सोडवणुकीत त्यांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## राज्यस्तरीय टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत नाशिकच्या मुलींचा संघ उपविजेता

### विंचूरच्या कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयाची विद्यार्थिनी पल्लवी निकमची चमकदार कामगिरी

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१०, विंचूर (नाशिक) :** लातूर जिल्ह्यातील उदगीर येथे नुकत्याच संपन्न झालेल्या २४ व्या महाराष्ट्र राज्य ज्युनिअर (ण-१९ मुले व मुली) टेनिस बॉल क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धा २०२६ मध्ये नाशिक जिल्ह्याच्या मुलींच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत राज्यात द्वितीय क्रमांक पटकावत उपविजेतेपद मिळविले. या उल्लेखनीय यशात रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय व कला, विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, विंचूर येथील विद्यार्थिनीकु. पल्लवी सोमनाथ निकमहिने महत्त्वपूर्ण योगदान देत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. टेनिस बॉल क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र व टेनिस बॉल क्रिकेट असोसिएशन लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या प्रतिष्ठेच्या राज्यस्तरीय स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील संघ सहभागी झाले होते. अत्यंत चुरशीच्या



आणि स्पर्धात्मक वातावरणात नाशिक जिल्ह्याच्या मुलींच्या संघाने साखळी तसेच बाद फेरीतील सामने जिंकत अंतिम फेरीपर्यंत दमदार मजल मारली.

**पल्लवीची अष्टपैलू कामगिरी**

संघातील अष्टपैलू खेळाडू म्हणून ओळख असलेल्या पल्लवी निकम हिने फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही विभागांत उत्कृष्ट कामगिरी करत संघाच्या यशात मोलाचा वाटा उचलला. तिच्या सातत्यपूर्ण आणि प्रभावी खेळामुळे नाशिक संघाला निर्णायक क्षणी बळ मिळाले. पल्लवीच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे विंचूर परिसरासह संपूर्ण नाशिक जिल्ह्याचा गौरव वाढला असून क्रीडा क्षेत्रात नव्या पिढीसाठी ती प्रेरणादायी ठरली आहे.

**ग्रामीण भागातील कौतुक :**

पल्लवी निकम हिच्या या यशामुळे विंचूरसह निफाड तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, ग्रामीण भागातील विद्यार्थिनीही क्रीडा क्षेत्रात मोठे यश संपादन करू शकतात, याची प्रचिती पुन्हा एकदा आली आहे. तिच्या भविष्यातील राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांसाठी सध्या शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

**मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षा**

वपल्लवी निकमच्या या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य राजेंद्र चांदे, जनरल बॉडी सदस्य डॉ.सुजित गुंजाळ, स्थानिक सल्लागार समिती अध्यक्ष जगदीश जेऊघाले, उपाध्यक्ष कैलास सोनवणे व सर्व सदस्य, व्यवस्थापन समिती अध्यक्ष राजु गोरे, उपाध्यक्ष व इतर सदस्य यांनी अभिनंदन केले.

तसेच विद्यालयाचे प्राचार्य नंदकुमार देवढे, उपप्राचार्य वाबळे, पर्यवेक्षक ठाकरे व माळी, विभाग प्रमुख राजेंद्र टिळेकर, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, माता-पालक संघ, पत्रकार संघ तसेच माजी विद्यार्थी असोसिएशन यांनीही पल्लवीचे कौतुक करत तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.नाशिक जिल्हा टेनिस बॉल क्रिकेट असोसिएशनचे सचिव मुकुंद झनकर यांच्या नियोजनबद्ध नेतृत्वाखाली आणि संघ प्रशिक्षक मा. प्रदीप राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली संघाने ही उल्लेखनीय कामगिरी केली. खेळाडूंची मेहनत, प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि संघभावना यांच्या जोरावर नाशिक संघाने राज्यस्तरावर उपविजेतेपदाचा मान मिळविला.

## भरदिवसा कारमधून ५ लाखांची बॅग लंपास; अज्ञात चोरटे दुचाकीने पळाले

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१०, नागपूर :** बँकेतून ५ लाख रुपयांची रक्कम काढून पेप्सी कंपनीत घेऊन जाणाऱ्या स्टोअर किपरला भरदिवसा लुटल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. खापरखेडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पिपळा (डाकबंगला) राष्ट्रीय महामार्गावर एका हॉटेलसमोर दिनांक ०९ जून २०२६ रोजी दुपारी साडेतीन वाजेच्या सुमारास हा प्रकार असून चोरट्यांनी कारमध्ये ठेवलेली ५ लाखांची बॅग लंपास केली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार पेप्सी कंपनीत कार्यरत असलेले स्टोअर किपर संपत शाहू आणि चालक अतुल काळे हे दोघे चक-४०-इग-१८९८ क्रमांकाच्या कारने नागपूरच्या शंकरनगर येथील एचडीएफसी बँकेतून ५ लाख रुपये काढून सावनेर येथील पेप्सी कंपनीकडे जात होते. दरम्यान राष्ट्रीय महामार्गावरील पिपळा (डाकबंगला) येथील श्री साई रेस्टॉरंट समोर त्यांनी चहा पिण्यासाठी कार थांबवली. मात्र, यावेळी कार थांबवताना त्यांनी कारचे



दरवाजे आणि खिडक्या बंद केल्या नाहीत. आधीच पाळत ठेवून असलेल्या दोन अज्ञात चोरट्यांपैकी एक जण दबा धरून बसला होता तर दुसरा काही अंतरावर दुचाकी सुरू ठेवून उभा होता. दुपारी ठीक ३:४० वाजताच्या सुमारास एका चोरट्याने गुपचूप कारमध्ये ठेवलेली ५ लाख रुपयांची बॅग उचलली व वाट पाहत उभ्या असलेल्या सहकाऱ्याच्या दुचाकीवर बसून सावनेरच्या दिशेने पळून गेले चोरीची घटना हॉटेल मधल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली. मात्र, चोरट्यांनी घटनेत वापरलेल्या दुचाकीला नंबर प्लेट नसल्याचे माहिती मिळाली आहे. सदर घटना लक्षात येताच संपत शाहू व कारचालक अतुल काळे यांनी पाठलाग केला. मात्र चोरट्यांचा पत्ता लागला नाही. यासंदर्भात खापरखेडा पोलीसांना घटनेची सूचना मिळताच वेगवेगळे पथक तयार करून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज व चोरट्यांचा शोध घेत आहे.

या संपूर्ण घटनेत मोठा कट रचला गेल्याची शक्यता वर्तवली जात आहे. संपत शाहू यांच्याकडे कंपनीच्या बँक व्यवहारांची जबाबदारी आहे. बँकेतून ५ लाख रुपये घेऊन येत असल्याची माहिती चोरट्यांपर्यंत पोहोचली कशी? असा प्रश्न निर्माण झाला आहे. सदर घटनेत सर्वात महत्त्वाचे म्हणजे एवढी मोठी रक्कम कार मध्ये असताना कारचे दार व खिडक्या उघड्या ठेवून चहा प्यायला का गेले असे अनेक प्रश्न यानिमित्ताने समोर येत आहे. खापरखेडा पोलीस या दिशेने तपास करीत असून लवकरच गुन्ह्याचा पर्दाफाश होईल असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

# थोडक्यात

## सायन पनवेल महामार्गावर सखोल स्वच्छता मोहीमांद्वारे साफसफाई



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१०, नवी मुंबई :** शहर स्वच्छतेकडे विशेष लक्ष देतांना प्राधान्याने वर्दळीच्या जागा तसेच दुर्लक्षित जागा यांच्या स्वच्छतेकडे विशेष लक्ष दिले जात असून जागतीक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून ०५ जूनपासून १२ जूनपर्यंत विशेष स्वच्छता मोहीमांचे आयोजन नमुंमपा घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या वतीने आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार करण्यात येत आहे.या अंतर्गत नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्व रेल्वे स्टेशन, सायन पनवेल हायवे, झोपटपट्टी, गाव/गावठाण क्षेत्र, तलाव व खाडी किनारे अशा विविध ठिकाणी विशेष स्वच्छता मोहीमा घेण्यास सुरुवात झाली आहे. आता घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ लागू करण्यात आले असून याबाबत व्यापक जनजागृती ही करण्यात येत आहे.त्या अनुषंगाने शहरातून जाणारा मुख्य सायन पनवेल महामार्ग याच्या स्वच्छतेकडे विशेष लक्ष देत दि. ०६ ते १० जून या कालावधीत नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील महामार्गाच्या दोन्ही बाजूला विशेष स्वच्छता मोहीम राबवली जात आहे. यामध्ये सायन पनवेल महामार्गावरील कोकण भवन सर्कल ते उरण फाटा, उरण फाटा ते एल.पी. जंक्शन, एल.पी. जंक्शन ते शिरवणे फाटा, जुईनगर स्टेशन ते सानपाडा अंडर पास व वाशी येथे विशेष स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. यावेळी बेलापूर, नेरूळ, तुर्भे व वाशी विभाग कार्यालयातील नमुंमपा अधिकारी व कर्मचारी तसेच स्वच्छता दूत यांनी आपापल्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या सायन पनवेल महामार्गाच्या भागाची स्वच्छता केली. या मोहीमेत १४८ स्वच्छता दूतांनी सक्रीय सहभाग घेतला. येथून २.५ टन केरकचरा व माती जमा करण्यात आली. त्याचप्रमाणे स्वच्छता झाल्यानंतर या मार्गावर फॉगर मशिन तसेच यांत्रिकी वाहनाद्वारे विशेष साफसफाई करण्यात आली. महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या नियंत्रणानुसार, घनकचरा व्यवस्थापन उपआयुक्त डॉ.अजय गडदे यांच्या माध्यमातून संबधित स्वच्छता अधिकारी व स्वच्छता निरीक्षक यांच्यासह १४८ स्वच्छताकर्मींनी सायन पनवेल महामार्ग स्वच्छ केला. स्वच्छता ही नियमित करण्याची बाब असल्याने महामार्गावरील स्वच्छता मोहीमा नियमितपणे घेण्यात याव्यात अशा सूचना आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी दिल्या असून त्यानुसार अंमलबजावणी करण्यात येत आहे.

## अवैध दारू विक्रेत्यांकडून प्रत्येकी १ लाख रुपयांचे बाँड; पुनर्विक्री केल्यास दंडात्मक कारवाई

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.१०, राहुरी (अहिल्यानगर) :** राहुरी तालुक्यातील अवैध दारू विक्रेत्यांविरोधात राहुरी पोलिसांनी प्रतिबंधात्मक कारवाईची मोहीम हाती घेतली असून, वारंवार गुन्हे दाखल असलेल्या चार अवैध दारू विक्रेत्यांकडून प्रत्येकी १ लाख रुपयांचे एक वर्ष मुदतीचे बाँड घेण्यात आले आहे. भविष्यात पुन्हा अवैध दारू विक्री केल्यास संबंधितांकडून एक लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली.

तीनपेक्षा अधिक गुन्हे दाखल असलेल्या अवैध दारू विक्रेत्यांविरोधात महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाच्या कलम ९३ अन्वये प्रतिबंधात्मक कारवाईसाठी एकूण २१ प्रस्ताव श्रीरामपूरचे प्रांताधिकारी किरण पाटील यांच्याकडे पाठविण्यात आले होते. त्यापैकी चार आरोपींकडून प्रत्येकी १ लाख रुपयांचे बाँड घेण्यात आले आहे.

बाँड घेतलेल्या आरोपींमध्ये अजय रामराव जाधव (रा.देवळाली प्रवरा), कोंडाजी रामदास आघाव (रा.बारागाव नांदूर), आशाबाई बाळासाहेब गायकवाड (रा.देवळाली प्रवरा) व प्रल्हाद शेषराव डुकरे (रा.चिंचोली फाटा) यांचा समावेश आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बाँडची मुदत सुरू असताना संबंधित आरोपींकडून पुन्हा अवैध दारू विक्री आढळून आल्यास त्यांचे बाँड रद्द करण्यात येईल. तसेच आरोपी व त्यांचे जामीनदार यांच्याकडून प्रत्येकी एक लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात येणार आहे. दंडाची रक्कम न भरल्यास संबंधित आरोपी व जामीनदारांच्या मालमत्तेवर, तसेच सातबारा उताऱ्यावर शासनाच्या वसुलीचा बोजा चढविण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. यावेळी राहुरी तालुक्यातील नागरिकांना आवाहन करण्यात आले असून, कोणत्याही आरोपीस जामीन देताना तो जामिनाच्या अटी व शर्तींचे पालन करेल याची खात्री करावी. अन्यथा जामीनदार म्हणून भविष्यात आर्थिक जबाबदारी स्वीकारावी लागू शकते, याची नागरिकांनी नोंद घ्यावी, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक ठेंगे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. या कारवाईचा पाठपुरावा पोलिस उपनिरीक्षक गणेश वाघमारे, समाधान फडोळ, राजेंद्र जाधव, पोलीस हवालदार सूरज गायकवाड, राहुल यादव, गणेश मैड, सचिन कोळी आणि वृषाली कुसळकर यांनी केला.

## ठाणे शहरातील काही भागात उद्या २४ तास पाणीपुरवठा बंद

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१०, ठाणे :** ठाणे महानगरपालिका क्षेत्रात एमएमआरडीए मार्फत आनंदनगर ते साकेत पर्यत एलिव्हेटेड रोडचे कामादरम्यान इंदिरा नगर संपकडे जाणारी ८१३ मि.मी व्यासाची उर्ध्ववाहिनी बाधित होत असल्याने एमएमआरडीएकडून ९०० मि.मी व्यासाची जलवाहिनी २२०० मीटरपैकी ८०० मीटर अंतरापर्यत अंथरण्याचे काम पूर्ण झाले आहे. ८०० मीटर अंतरापर्यंत अस्तित्वातील ८१३ मि.मी व्यासाची जलवाहिनी निकामी करुन नव्याने अंथरण्यात आलेली ९०० मि.मी व्यासाची जलवाहिनी कार्यान्वित करण्याकरिता जलवाहिनीच्या जोडकामासाठी पाणीपुरवठा बंद ठेवण्याची मागणी केली आहे. सदर कामाकरिता शुक्रवार दिनांक १२/०६/२०२६ रोजी सकाळी ९.०० ते शनिवार दिनांक १३ जून २०२६ रोजी सकाळी ९.०० वाजेपर्यत एकूण २४ तास पाणीपुरवठा बंद राहणार आहे.या शटडाऊन कालावधीत ठाणे महापालिकेअंतर्गत इंदिरानगर, साठेनगर, आंबेवाडी, डवलेनगर, सावरकरनगर, लोकमान्य नगर पाडा नं. २,३, व ४, चैतीनगर, परेरानगर, झांजेनगर, श्रीनगर, किसननगर, शिवटेकडी, शांतीनगर, कैलासनगर, भटवाडी, वारलीपाडा, रुपादेवी पाडा, रामनगर, सीपी तलाव, येऊर परिसर इत्यादी भागाचा पाणीपुरवठा २४ तासांसाठी पूर्णपणे बंद राहील. पाणीपुरवठा सुरू झाल्यानंतर पुढील १ ते २ दिवस कमी दाबाने पाणीपुरवठा होईल याची नागरिकांनी नोंद घ्यावी.ठाणे महानगरपालिकेमार्फत सदर कपातीच्या कालावधीत पाणी काटकसरीने वापरुन ठाणे महानगरपालिकेस सहकार्य करावे असे आवाहन पालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.